# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

## प्रेसनोट

**2023**

**गुन्हे शाखा, नवी मुंबई** **दिनांक ०३.०३.२०२३**

**रबाले पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध एकत्रीत रित्या जमलेल्या १८ बांगलादेशी नागरीरकांविरुध्द गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने केली कारवाई ४०,९४०/- रुपये किंमतीची मालमत्ता जप्त.**

---------------------------------------------------------------

मा.पोलीस आयुक्त, श्री.मिलींद भारंबे, मा. पोलीस सह आयुक्त, श्री. संजय मोहीते, मा.पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, श्री.अमित काळे, सहा.पोलीस आयुक्त, अ.मा.वा.प्र. कक्ष गुन्हे शाखा श्री. शैलेश पासलवाड यांनी नवी मुंबई हद्दीत अवैधरित्या वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी नागरीकांविरुध्द कारवाई करण्याचे आदेश दिलेले होते.

दिनांक ०१/०३/२०२३ रोजी अतुल आहेर वपोनि अ.मा.वा.प्र.कक्ष गुन्हे शाखा यांना त्यांचे गुप्त बातमीदारांकडुन मिळालेल्या बातमीच्या आधारे माहिती मिळाली की, सभुज नावाच्या बांगलादेशी इसमाच्या लग्नाचा वाढदिवस असल्याने काही बांगलादेशी पुरूष व स्त्रिया या घणसोली गावातील मोरया अपार्टमेंट घर नंबर १४२१, म्हात्रे आळी येथील बिल्डींग मध्ये रूम नं.१०२ तसेच बिल्डींगच्या टेरेस वर पार्टी करण्यासाठी एकत्रीत येणार असल्याचे समजले होते. मिळालेल्या माहीतीवरून मा.पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, श्री.अमित काळे यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि निलम पवार, पोउपनि/शरद भरगुडे, सपोउपनिरी शेटये, पोहवा/१३२ अनिल मांडोळे पोहवा/२१०८ विजय चौधरी,पोहवा /९७२ पवार, मपोहवा /१६५१ पोटे, मपोहवा/१६४२ तांडेल मपोना/२५०४ अडकमोल,पोना/२४२७ गोसावी, पोशि २६५४/ठाकूर,पोशि/ ३२३९ पारासुर, चालक पाशि/४६०८ तांदळे सर्व नेमणुक अ.मा. वा.प्र.कक्ष, गुन्हे शाखा, नवी मुंबई यांनी कोपरखैरणे पोलीस ठाण्याच्या हददीत मोरया अपार्टमेंट घर नंबर १४२१, म्हात्रे आळी येथील बिल्डींग मध्ये रूम नं. १०२ ,घणसोली नवी मुंबई येथे छापा टाकला असता अवैधरित्या वास्तव्यास असलेलले बांगलादेशी नागरीक पुरूष व स्त्रिया असे एकुण १८ जण मिळुन आले त्यांचेकडे भारतात वास्तव्यासाठी लागणारा कोणताही वैध पुरावा मिळुन न आल्याने आरोपी क्र. ०१ ते १८ यांना ताब्यात घेउन रबाळे पोलीस ठाण्यामध्ये गु.रजि.क्र. १०१/२०२३ पासपोर्ट अधिनियम कलम ३ (अ), ६(अ), सह विदेशी नागरीक अधिनियम कलम १४(अ) अन्वये गुन्हा दाखल करुन आरोपी क्रमांक ०१ ते १८ यांना मा. कोर्टात हजर केले असता मा. कोर्टाने दिनांक ०२/०३/२०२३ रोजी पावेतो आरोपींना न्यायालयीन कोठडी दिली आहे.

-------------